<u>निशाणी क्र.५९ वरील आदेश</u>
**(दिनांक १९.०७.२०२५)**

१. प्रस्तुत अर्ज व पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, शेगांव शहर यांनी सादर केलेला अहवाल पाहिला. आरोपीने पटलावर, मोबाईलच्या बीलाची प्रत सादर केली आहे. या कागदपत्राच्या अवलोकनार्थ अर्जदार हा जप्त विवो व्ही-२३ प्रो कंपनीचा मोबाईल ज्याचा आय.एम.इ.आय.क्र.८६७७१८०५८१६४६५७ व ८६७७१८०५८१६४६४० चा तो योग्य मागणीदार वाटतो.

२. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी जप्त मोबाईल आरोपीस परत देण्यात येवु नये. सदर मोबाईल हा प्रकरणातील महत्वाचा पुरावा असुन आरोपी सदर मोबाईलमध्ये फेरबदल करुन विल्हेवाट लावु शकतो असे म्हणने सादर करुन हरकत असल्याचे कथन केले.

३. सदर जप्त मोबाईल फोन पोलीस ठाण्यात तसेच पडून राहील्यास सदर मोबाईल फोनचे नुकसान होवू शकते. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी <u>सुंदरभाई देसाई -वि- गुजरात राज्य</u>, २००२ Supp (3) SCR, 39 या निर्णयविधीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार मी अटी व शर्तीवर खालील आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, शेगांव शहर यांना निर्देश देण्यात येतो की, त्यांनी अपराध क्र.१३३/२०२५ मध्ये जप्त विवो व्ही-२३ प्रो कंपनीचा मोबाईल ज्याचा आय.एम.इ.आय.क्र.८६७७१८०५८१६४६५७ व ८६७७१८०५८१६४६४० हा आरोपी क्र.३ निखील हिंमतलाल कहार यांना, रु ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) च्या सुपूर्दनामा बॉण्डवर, ताबडतोब दयावा. |
| ३. | तपास अधिकरी यांनी अर्जदाराच्या खर्चाने सदरहू मोबाईल फोनचे फोटो |

| | |
|---|---|
| | काढून त्याचा रितसर पंचनामा करुन ते दोषारोपपत्रासोबत जोडावे. |
| ४. | साक्षी पुराव्याचे वेळी आवश्यकता वाटल्यास अर्जदाराला सदरहू मोबाईल फोनन्यायालयासमक्ष हजर करावा लागेल. |
| ५. | अर्जदाराने प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत सदरहू मोबाईल फोनमध्ये कोणत्याही प्रकारचे फेरबदल करु नये किंवा त्याची विल्हेवाट लावू नये. |

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2025.07.19 17:10:36 +0530

दिनांक :- १९-०७-२०२५

(श्रीमती एम. के. गोटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग २ रे कोर्ट शेगांव.

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः- जी.डी.भोयटे, लघुलेखक ग्रेड-३.

न्यायालयाचे नांवः- न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे कोर्ट, शेगांव.

दिनांकः-१९.०७.२०२५